प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

किंमत फक्त २.०० रु.

मुंबई

मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाच वेळी प्रसिद्ध पाने १२+४=१६

स्थापना वर्ष ७२ ▪ मुंबई आवृत्ती वर्ष २ ▪ अंक ५५ ▪ बुधवार ३० जून २०१० ▪ किंमत २.०० रु. ई-पुढारी : http//epaper.pudhari.com

पुढारी सोनेरी

# प्रसाद ग्रूपच्या थ्रीडी कॅमेऱ्याचे आगमन

साधारण पंचवीस वर्षापूर्वी आलेल्या छोटा चेतन या चित्रपटाच्या थ्रीडी प्रकाराने प्रेक्षकांना मनोरंजन दिले असून अलीकडेच आलेल्या जेम्स कॅमरूनच्या 'अवतार'ने आपण पडद्यावरच्या दृश्यातच सहभागी होतो, असा आनंद दिला. परंतु आता आपल्या देशात या अनोख्या तंत्राचा चित्रपट चित्रीत करण्यासाठी स्वतंत्र कॅमेरादेखील आला असून प्रसाद ग्रूपच्या वतीने ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या अनोख्या कॅमेराला नुकतेच मुंबईत प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी व चित्रपटसृष्टीतील काही मान्यवरांसमोर सादर करण्यात आले असून कॅमेरामन अशोक मेहता, डब्ल्यु. बी. राव, निर्मल जानी, प्रवीण भट्ट, अनिल मेहता, प्रेम सागर, संदीप चॅटर्जी, आर. एम. राव या मान्यवरांच्या उपस्थितीत त्याचे उद्घाटन करण्यात आले. प्रसाद ग्रुपच्या वतीने यापूर्वीच ७. एम.एम., सिक्स




ट्रॅक्स रेकॉर्डिंग, पॅनाव्हिजन कॅमेरा या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. एल. व्ही. प्रसाद यांची सामाजिक कौटुंबिक चित्रपटाचे निर्माते अशी ओळख आहे.